९३ I

... मातृभूमीस,

आदर नमस्कार वि. वि.

कशी आहेस? हा प्रश्न अनेक दिवसांपासून विचारायचे मनात होते. आज निमित्त
मिळाले असे म्हणतात की पोस्टातील पत्र त्याच्या ठिकाणच्या पत्त्यावर पोहचतात, या विश्वासाने
हे पत्र तुला आज पोस्ट करतेय.

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसे। असे अभिमानपूर्वक म्हणावे अशी तुझीथोरवी
तुझ्या भूमीत इसवीसनाच्या पूर्वी हजारो वर्षे जगातील आद्य संस्कृतीचा जन्म झाला. तूच
सर्व धर्मांच्या अन नाना जातीच्या लोकांना आपल्या उदारतेने सामावून घेतलेस जीवनाचे
सार सांगणारे चार वेद, वेदान्त शिकवणारी उपनिषदे तुझ्याच मातीत जोपासली गेली.
सिद्धार्थाला बोद्ध धर्माचे ज्ञान तुझ्याच 'गये'तील बोधिवृक्षाखाली झाले. शंकराचार्यांचे
महावीरांचे तत्त्वज्ञान याच मातीत फुलले.

मातृभूमी, तू शूरवीरांची भूमी। सिकंदराला धैर्याने सामोरा जाणारा पौरस,
चक्रवर्ती सम्राट अशोक, विक्रमादित्य इत्यादी शूरवीरांनी पराक्रमाचे धडे तुझ्याच मातीत
गिरवले. तुझ्यासाठी आपल्या प्राणांचीही पर्वा न करता हसत हसत मृत्युशी
सामना करणारे शूरवीर जवान हे तुझ्याच उदरातून जन्मले. अशा तुझ्या
पावन भूमीवर माझा जन्म झाला याचा मला अभिमान वाटतो.

जिजाऊसारख्या वीरमाताही येथेच होऊन गेल्या. तुझ्या स्वाभिमानासाठी
झाशीच्या राणीसारख्या वीरांगणा प्राण पणाला लावून लढल्या. तुझ्याच
अंगातून कल्पना चावलासारख्या अवकाश वीरांगणेचा जन्म झाला. या
भूमीची मी 'कन्या' आहे या जाणीवेतून शौर्य आणि धैर्य नसानसांत
वाहू लागते.

तुझी विविधतेने नटलेली समृद्ध भूमी, जिचा मोह परकीयांनाही
वारंवार झाला. पण एकीकडे भौतिक समृद्धी असताना दुसरीकडे
भयग्रस्त जीवनाची चाहूल येते. विज्ञानाने सारी सुखे दाराशी आणून
ठेवली तरी अनवधानाने किंवा विज्ञानाच्या दुरुपयोगाने होणाऱ्या
विनाशाची कल्पना करतानाही थरकाप उडतो.

मी केरळच्या प्रलयाची बातमी प्रसारमाध्यमात पाहिली, जी तु
अनुभवलीस. घरं-माणसं उद्ध्वस्त करणारी ती घटना होती. पण अशा
संकटात तुझ्याच सुपुत्रांचे मदतीचे हात पुढे आले. पुरात वाहून गेलेले
नव्याने उभे करण्याचे धैर्य तुझ्याकडून मिळाले. हे पाहिल्यावर भारत माझा
देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा सार्थ ठरल्यासारखी
वाटली.

एकच तारा समोर आणि पायतळी अंगार।

अशा परिस्थितीत तू नवीन युगात पाऊल ठेवलेस. आज स्वातंत्र्य प्राप्त
करून सत्तर वर्षे झाली असली तरी गांधीजी, टिळक, नेहरू, सावरकर, भगतसिंग
यांसारख्या तुझ्या महान सुपुत्राच्या स्फूर्तीच्या अमरज्योती आमच्या मनात
अजूनही तेवत आहेत. ज्यांना मातृभूमीकडून आपलेपणा मिळाला नाही त्या
शीखांची फरफट पाहिली आहे. हे मातृभूमी, तुझ्याकडून जे प्रेम आम्हाला
मिळाले ते आमच्यासाठी अनमोल आहे. तुझ्यासाठीच तर शेकडो देश-
भक्तांनी बलिदान केले.

पण त्यांनी जी स्वप्ने पाहिली ती आजही प्रत्यक्षात उतरताना
दिसत नाही. ज्या मूल्यासाठी देशभक्तीचा लढा उभारला होता ती मूल्ये
आज नाहीशी होताना दिसत आहेत. गरीबी, विषमता, अज्ञान, बेरोजगारी,
जातीयवाद या सर्व व्याधी तुला पोखरून काढत आहेत. भ्रष्टाचार हा आज
शिष्टाचार बनला आहे. जेथे अहिंसेसारख्या मूल्यासाठी बापूंनी आपले आयुष्य
समर्पित केले, त्याच भूमीत धर्म, आरक्षण या कारणासाठी दंगे होत आहेत.

नक्षलवाद, आतंकवाद यांसारख्या आंतराष्ट्रीय प्रश्नापासून उघड्यावर
शौचास बसण्यासारखे सामान्य जनांचे प्रश्न आमच्यासमोर उभे आहेत. या
प्रश्नांची उत्तरे आम्हालाच शोधायची आहेत. आमच्यासाठी तर 'भारतीय' ही आमची
जात, 'देशप्रेम' हा धर्म आणि 'माणुसकी' हे धर्माचरण आहे. साधनांची कमतरता
असली तरीदेखील हार मानणार नाही तो केवळ दुर्दम्य आशावादाच्या जोरावर।
मी पासून आम्ही बनू. भूमिपुत्राला समृद्ध बनवू. ही भूमी सुजलाम-सुफलाम करू

Scanned by CamScanner

तुझ्यासाठी लढणाऱ्या सैनिकाची शक्ती बनू.
हे मातृभू तुझे मी फेडीन पांग सारे
आणिन आरतीला हे सूर्य-चंद्र-तारे।
या ओळी आम्हाला सिद्ध करून दाखवायच्या आहेत. त्याची सुरवात माझ्या पासून करायची आहे. तुझी भरभराट हे आम्ही उघड्या डोळ्यांनी पाहिलेले स्वप्न आहे. जे आज आमचे ध्येय बनले आहे. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी तुझा आशिर्वाद हवा आहे.
त्यासाठी मी वाट पाहत आहे पत्र घेऊन येणाऱ्या पोस्टमन काकांची आणि त्या पत्राद्वारे येणाऱ्या तुझ्या 'आशिर्वादाची'.

कळावे.
लोभ असावा.

तुझी लेक,
विनया विजयविभा

"I certify that I am above of 18 as on 01/01/2018."
Contact No:- 8879286702.

पहला मोड FIRST FOLD

प्र.मु./ S.P.P.,HYD. - 2018

इस पत्र के अन्दर कुछ न रखें NO ENCLOSURES ALLOWED
पते में पिन कोड लिखें WRITE PIN CODE IN ADDRESS
प्रेषक का नाम और पता :— SENDER'S NAME AND ADDRESS :—

Miss Vinaya Vijay Jadhav
Room No:-10, A Wing, First Floor, MHADA TRANSIST CAMP LALBAUG.
पिन PIN 400012

PHILATELY: KING OF HOBBIES
CONTACT: Nearest Philatelic Bureau
COLLECT INDIA POSTAGE STAMPS

दूसरा मोड SECOND FOLD

I st prize Above 18

अन्तर्देशीय पत्र कार्ड
INLAND LETTER CARD

"DHAI - AKHAR" LETTER WRITING COMPETITION

भारत INDIA 250
इन्दिरा गांधी INDIRA GANDHI

017362

निदेशक मुंबई जी.पी.ओ.
Director Mumbai GPO 400 001.
25 2018
प्राप्त/RECEIVED

To,
Chief Postmaster General,
Maharashtra Circle, Mumbai
Mumbai GPO

(इस लाइन के नीचे न तो लिखें और न ही मुद्रित करें Do not write or print below this line) ____ पिन PIN 400001.

यहाँ काट कर खोलिए TO OPEN CUT HERE